# "महिलांवरील अत्याचारा संदर्भात" दाखल झालेल्या गुन्हयांची माहिती

## दि. २९.११.२०१७

| गुन्हे प्रकार | पो स्टे गु.र.नं.क | गु.घ.ता. वे. ठि. | गुन्हयाची हकीगत | तपास |
|---|---|---|---|---|
| | | | **विनयभंग** | |
| **स्त्री अत्याचार ०६** | वारजे ४२९/१७ ४५२ ३५४ ३२३ ५०४ ५०६ ३४ | २९/११/१७ १२/३० | फिर्यादी व आरोपी एकमेकांचे ओळखीचे असुन फिर्यादीचे पती हे त्यांचे मुळ गांवी भालगुडी,मुळशी येथे गेले असताना गावाचे यात्रेचे नियोजन व भैरवनाथ मंदिराचे बांधकामाचे नियोजनाबाबत झालेल्या मिटींगमध्ये फिर्यादीचे पतीची आरोपी यांचे सोबत झालेल्या वादातुन आरोपीने फिर्यादी यांचे दुकानामध्ये घुसुन फिर्यादीस शिवीगाळ व हाताने मारहाण करुन फिर्यादी यांचा ब्लाऊज फाडुन विनयभंग केला असुन फिर्यादी यांनी पतीस फोन करुन दुकानामध्ये बोलविले असता आरोपी यांनी फिर्यादी यांचे पतीस देखील शिवीगाळ व हाताने मारहाण करुन पुन्हा गावाकडे आल्यास हात-पाय तोडण्याची धमकी दिली आहे. | मपोउपनि गायकवाड |
| | समर्थ २३०/१७ ३५४ ५०६ | २६/११/१७ २३/३० ते २८/११/१७ १८/०० | फिर्यादी व आरोपी एकमेकंाचे ओळखीचे असुन आरोपीने फिर्यादीचे घरी येऊन फिर्यादी सोबत अश्लिल बोलुन फिर्यादीचा हात धरुन व फिर्यादीचे कमरेमध्ये हात लावुन विनयभंग केला आहे. | पोउपनि शिरसाठ |
| | सांगवी ४७८/१७ ३५४ अ ५०४ | २६/११/१७ ११/३० ते १२/०० | फिर्यादी यांचे भाच्याचे सासरे आरोपी यांनी फिर्यादी यांना विधवांसाठी सरकारी अनुदान फार्म देण्याचे बहाण्याने घरी घेऊन जाऊन फिर्यादीस पाठीमागुन मिठी मारुन, अश्लिल बोलुन विनयभंग केला आहे.<br>गुन्हा उशिरा दाखल कारण :- फिर्यादी यांनी आज रोजी तक्रार दिल्याने गुन्हा दाखल. | पोउपनि बागुल |
| | वानवडी ५५०/१७ | २८/११/१७ १४/४५ ते १५/०० | फिर्यादीया त्यांचे मोसावरुन जात असताना मोसावरुन आलेल्या आरोपीने फिर्यादीचा पाठलाग करुन फिर्यादीकडे वाईट नजरेने पाहुन विनयभंग केला आहे. | मपोउपनि काळे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ३५४ ड | | | |
| | विश्रांतवाडी<br>४२४/१७<br>३५४ ३५२ ४२७<br>३२३ ५०४ | २८/११/१७<br>१६/०० | फिर्यादी व आरोपी नातेवाईक असुन फिर्यादी यांनी कचरा बाहेर टाकला नाही या कारणावरुन फिर्यादी व फिर्यादीचे सासुमध्ये झालेल्या वादातुन फिर्यादीचा दिर आरोपी क्रं १ व त्यांची पत्नी,मुले इतर आरोपी यांनी फिर्यादीस शिवीगाळ व हाताने मारहाण करुन फिर्यादीचा गाऊन फाडुन विनयभंग केला<br>असुन सदर भांडणामध्ये फिर्यादीचे सोन्याचे मंगळसुत्र तुटुन ४००/- रु चे नुकसान झालेले आहे. | पोउपनि गायकवाड |
| | | | **अपहरण** | |
| | भा पिठ<br>५६१/१७<br>३६३ | २९/११/१७<br>१०/०० | फिर्यादी यांची अल्पवयीन मुलगी हिस आरोपीने अमिष दाखवुन,फुस लावुन पळवुन नेले आहे. | पोउपनि ताटे |